**ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प , लातूर**

16h ·

ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात आज राजर्षी शाहू महाविद्यालयातील बी.एस्सी.चे विद्यार्थी साहिल जाधव व परमेश्वर पांढरे यांनी Cyber Awareness विषयावर इ ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- अनोळखी फोन, संदेश व लिंकवर विश्वास ठेवू नये.
- कोणतेही ॲप डाउनलोड करताना Camera, Microphone, Location, Contacts यांसारख्या Permissions देऊ नये.
- OTP, PIN, पासवर्ड, बँक माहिती व इतर वैयक्तिक माहिती कोणाला शेअर करू नये.
- मजबूत पासवर्ड तयार करण्यासाठी अक्षरे, अंक व विशेष चिन्हांचा वापर करावा.
- ऑनलाइन गेम खेळताना अनोळखी व्यक्तींशी चॅट करू नये, वैयक्तिक माहिती देऊ नये व अधिकृत ॲप स्टोअरवरूनच गेम डाउनलोड करावेत.
- ऑनलाइन गेमिंगचे दुष्परिणाम ( अभ्यासाकडे दुर्लक्ष, डोळ्यांवर ताण, झोपेच्या समस्या, मानसिक तणाव, आर्थिक फसवणूक) याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा व कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची खातरजमा करावी.
- सायबर फसवणूक झाल्यास त्वरित पालक, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले .
- विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत अनेक प्रश्न विचारले. सर्व प्रश्नांची सोप्या भाषेत समाधानकारक उत्तरे मुलांना मिळाली .
- हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माहितीपूर्ण, उपयुक्त व जागरूकता निर्माण करणारा ठरला.



